# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६, फॅक्स क्रं.:- ०७१२-२५६१६६३

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

## परिपत्रक

**क्रमांक : तंशिसं/विकाना/ईबीसी/माहिती/2017/** 181

**दिनांक :** - 4 JUL 2017

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, अनुदानित व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

**विषय :- विभागीय कार्यालयाने मागितलेल्या विविध विषयाबाबतची माहिती विहीत कालर्यादेत सादर करणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यांत येते की, या विभागांतर्गत असलेल्या संस्थेस या कार्यालयाद्वारे पाठविण्यांत आलेले ई-मेल संदेश आणि विभागीय कार्यालयाचे वेबसाईटवर टाकण्यांत आलेली माहिती संस्थांनी वेळोवेळी तपासावीत. ब-याच संस्था या कार्यालयाचे ई-मेल व वेबसाईट नियमित बघत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे विविध विषयाबाबत मागितलेली माहिती संस्थेकडून वेळीच या कार्यालयास प्राप्त होत नाही. त्यामुळे या कार्यालयास आवश्यक असणारी मागितलेली माहिती ही ब-याचदा कालमर्यादीत असल्याने दिलेल्या मुदतीत संचालनालयास सादर करणे शक्य होत नाही.

करीता आपणांस कळविण्यांत येते की, विविध विषयाबाबतची माहिती कालबाह्रय न होता दिलेल्या कालावधीतच या कार्यालयास सादर करता येईल याची संस्था प्रमुखांनी दक्षता घ्यावी, विहीत मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यास यास संस्थाप्रमुख सर्वस्वी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर.

**प्रत : प्रोग्रामर,तंशिविका.नागपूर. सदरहू पत्र संकेतस्थळावर अपलोड करण्याकरीता.**